**विशेष दिवाणी दावा नं. ७५/२०१९**
**नि. २८/क सोबत**

**उलटतपास शपथेवर पुढे सुरू**

**प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री.एस.एस.नरंदेकर यांचेकडून**

५. गोपाळ टेक्सटाईल्सचे प्रोप्रायटर उमादेवी भंवरलाल खंडेलवाल असल्याचे कागदपत्रे मी हजर केली आहेत. मोहित टेक्सटाईल्सचे प्रोप्रायटरशिप बद्दल मी कोणतेही कागदपत्र हजर केले नाहीत. उमादेवी या गोपाल टेक्सटाईल्सचे पूर्ण कामकाज पहातात. हे म्हणणे खरे नाही की उमादेवी या केवळ घरगुती काम करतात. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीला दि. १५.५.२०१८ रोजी दिलेल्या नोटीस (नि.३५) मध्ये प्रोप्रायटर उमादेवी यांचे नाव नाही. आता साक्षीदारास दि.१३०८.२०१९ चे वटमुखत्यारपत्र दाखवले. प्रतिवादीने सदरचे वटमुखत्यारपत्र मान्य असल्याने त्यास नि.५२ देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की वादातील रकमेबाबत वटमुखत्यारपत्रात तपशिल नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की मला साक्ष देण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की विपीन मलीक याच्याविरूध्द कलम १३८ प्रमाणे चेकची केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी प्रतिवादीमधील झालेल्या व्यवहाराची जबाबदारी चंद्रशेखर बोहरा यांनी स्वीकारलेली होती. हे म्हणणे खरे नाही की चंद्रशेखर आमच्या फर्मचे एजंट आहेत. हे म्हणणे खरे नाही की चंद्रशेखर इतर फर्ममध्ये जावून मालाची ऑर्डर घेवून ते आम्हाला देत होते. हे म्हणणे खरे नाही की वादी प्रतिवादीमध्ये आजअखेर कोणताही करार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की चंद्रशेखर बोहरा हे आमच्या फर्ममध्ये मार्केटींगचे काम करतात.

६. प्रतिवादीने माल नेल्याची कोणतीही पावती मी याकामी दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी अभिलेखावर बनावट पावत्या हजर केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी हजर केलेल्या पावत्यामध्ये मालाचे वर्णन नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी हजर केलेल्या पावत्याप्रमाणे प्रतिवादीला कोणताही माल मिळालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की आम्ही प्रतिवादीला पाठवलेल्या नोटीसमध्ये

वकीलांना कोणी माहिती दिली हे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने आजअखेर कोणत्याही मालाची मागणी केलेली नाही. उमादेवी या दररोज फर्ममध्ये येतात याचा कागदोपत्री तपशिल माझेकडे नाही. प्रतिवादींना माल पोहोचल्याची पोहोचपावती मी याकामी हजर केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की फर्मचे देणेघेणेची खतावणी मी स्वत: लिहित नाही. हे म्हणणे खरे आहे की खातेउता-यावर माझी सही नसते. हे म्हणणे खरे नाही की मी दैनंदिन व्यवहाराबाबत खोटी माहिती प्रतिज्ञापत्रात दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीला नोटीस मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीना मागणी केलेली रक्कम त्यांनी आमच्या एजंटला दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादीविरूध्द खोटा दावा दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

इचलकरंजी **( जी. एम. नदाफ )**
दिनांक – ०७.०८.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इचलकरंजी.